महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०१७

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मटण/चिकन सेंटर मधील टाकाऊ कचरा जैविक कचरा म्हणून घोषित करणेबाबत

(१) ८२२९ (०९-०४-२०१५). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण आणि शहरी भागात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर मटण, चिकन सेंटर चालविले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील सांताक्रुझ, विलेपार्ले, अंधेरी, कुर्ला, घाटकोपर, देवनार, गोवंडी या परिसरातील मटणांच्या दुकानातून प्राण्यांचे निरूपयोगी अवशेष उघड्यावर टाकेले जात असल्याने घार, गिधाडे गिरट्या घालत असल्याने विमानांना मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चिकन/मटण सेंटर मध्ये पशुपक्षांची हत्या करून टाकाऊ पदार्थ तेथील गटार वा उघड्यावर टाकण्यात येत असल्याने आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर टाकावू पदार्थ जैविक कचरा म्हणून घोषित करून त्यांची विल्हेवाट तशाच प्रकारे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) मुंबई महानगरपालिकेने कळविल्यानुसार सांताक्रुझ, विलेपार्ले, अंधेरी, कुर्ला, घाटकोपर, देवनार, गोवंडी सदर परिसर विमानतळ परिसराच्या जवळ असल्याने नागरी उड्डान प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या जी.व्ही.के. कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत संयुक्तरित्या पाहणी करुन अनधिकृत दुकानावर कारवाई करण्यात येते. सांताक्रुझ, विलेपार्ले परिसरात एच/पूर्व विभागात, विलेपार्ले व अंधेरी परिसरात के/पूर्ण विभागात, के/पश्चिम विभागात, कुर्ला परिसरात एल विभागात, देवनार व गोवंडी परिसरात एन एम/पूर्व विभागात ३८७ झाकणांसहित कचरा कुंड्या पुरविण्यात आलेल्या असून दिवसातून ३ वेळा हा कचरा उचलण्यात येतो.

(४) जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) १९९८ निर्गमित केला असून त्यामध्ये मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. (Schedule I-Category No.२)
(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मागासवर्गीय विभागाकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(२) १७९०२ (१०-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील मागासवर्गीय विभागाकरीता मागील तीन वर्षापासून मागासवर्गीय निधी उपलब्ध करुन दिला जात नसल्याप्रकरणी मागासवर्गीय नगरसेवकांनी दिनांक १९ मे, २०१५ रोजी निवेदन देऊन आमरण उपोषण करण्याचा इशारा दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता निर्णय घेतला व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी आतापर्यंत कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नाही तसेच मागासवर्गीयांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आतापर्यंत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

ठाणे महानगरपालिकेतील सार्वजनिक बांधकाम विभागाकरीता मागासवर्गीय निधी अंतर्गत महापालिका फंडातून महासभा व स्थायी समितीने मंजुर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीप्रमाणे मागील ३ वर्षात उपलब्ध करण्यात आलेला निधी खालीलप्रमाणे आहे :-

आर्थिक वर्ष	रुपये (कोटी)
२०१२-१३	३८.८६
२०१३-१४	५२.५१
२०१४-१५	६२.००

वरील प्रमाणे निधी उपलब्ध करण्यात आलेले आहे.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील निश्चित करण्यात आलेल्या मागासवर्गीय वस्त्यांमध्ये नागरीकांना पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करण्याच्या दृष्टीकोनातून स्थापत्य कामे, पाणीपुरवठा संबंधित कामे व दिवाबत्ती (विद्युत संबंधी) इ. कामे करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महानगरपालिकेच्या शाळांनी शालेय साहित्याची अद्याप निविदाच प्रसिध्द न केल्याबाबत

(३) २१२७४ (११-०८-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिकेतील शाळेत शिकणा-या विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे यंदाही शालेय साहित्याची प्रतिक्षा करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय साहित्याची निविदा प्रसिध्द करण्यासाठी शिक्षण मंडळाने महिन्या भरापूर्वी मंजुरी दिलेली असतानाही पालिका प्रशासनाने अद्यापपर्यंत निविदा प्रसिध्द केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया अद्यापपर्यंत का काढण्यात आले नाही, तसेच शालेय विद्यार्थ्यांना साहित्य कधीपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) काही महानगरपालिकांच्या बाबतीत हे अंशत: खरे आहे.

(३) महानगरपालिकेतील शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्याच्या निविदा प्रक्रिया आवश्यक कार्यवाही पूर्ण करुन विहित वेळेत प्रसिध्द करण्याबाबत, तसेच शालेय विद्यार्थ्यांना साहित्य विहित वेळेत मिळेल याची कटाक्षाने काळजी घेण्याबाबत सर्व महानगरपालिकांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनेक शहरांमध्ये बनविण्यात आलेल्या मॉल व मल्टीप्लेक्समध्ये नियमाचे सर्रासपणे उल्लंघन होत असल्याबाबत

(४) २२१०६ (११-०८-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक शहरांमध्ये बनविण्यात आलेल्या मॉल व मल्टीप्लेक्समध्ये नियमाचे सर्रासपणे उल्लंघन होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मॉल व मल्टिप्लेक्सनी नगरविकास विभाग आणि अग्निशमन विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी केवळ सुरक्षेसंबधीच्या उपाययोजना केल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी एखाद्या वेळी आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना सुरक्षितपणे बाहेर निघण्यास सुध्दा अडचण जाऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मॉल व मल्टीप्लेक्सची पाहणी केली असता यामध्ये अनेक गोष्टींचा सर्रासपणे उल्लंघन करण्यात आल्याचे दिसून आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या मॉल व मल्टीप्लेक्स इमारतीवर अग्निशमन व नगरविकास विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१), (२), (३) व (४) हे अंशत: खरे आहे.
(५) मॉल व मल्टीप्लेक्स मध्ये अनधिकृत बांधकाम आढळल्यास एम.आर.टी.पी. १९६६ अन्वये संबंधितांना नोटीस बजावून कारवाई करण्यात येते. तसेच दरवर्षी अनुज्ञापन नुतनीकरणाच्या वेळी नमुना "ब" प्रमाणपत्र घेण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात नळजोड अभय योजना कार्यान्वित करण्याबाबत

(५) २९४९२ (२१-१२-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सहा महिन्यांपूर्वी अनधिकृत नळजोडण्यांना कर आकारणीखाली आणण्यासाठी अभय योजना जाहिर करण्यात आली. परंतु सदरील कामे करण्यासाठी पाणीपुरवठा विभागाकडे कर्मचारीच उपलब्ध नसल्याने अद्याप एकही नळजोड अधिकृत झाला नसल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे सदरील नळजोड अभय योजना कार्यान्वित करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, दिनांक २९.१०.२०१५ अन्वये नागरी भागातील अनधिकृत नळ जोडण्यांचा आढावा घ्यावा व त्यांच्यावर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याकरीता विशेष कालबध्द कार्यक्रम राबविण्याबाबत निदेश देण्यात आले आहेत. सदर परिपत्रकांन्वये दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत सर्व नागरी स्थानिक संस्थांना कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-क चे सहा.आयुक्त अनधिकृत बाधकामांवर कारवाई करित नसल्याबाबत

(६) ३९६६० (१३-०५-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती-क मधील सर्व्हे क्रमांक १९०, ५४, १४३, ८१, १८६, १३२, १५२, २११, २१४, १७७, १८८ मधील अनधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्यास टाळाटाळ करीत असल्याचे व वरीष्ठांच्या सूचनांचा अवमान करीत असल्याचे आयुक्त यांच्या निदेशान्वये उप-आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी दिनांक २२ एप्रिल, २०१५ मध्ये एका लेखी पत्राद्वारे सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती-क वसई-विरार शहर महानगरपालिका यांना कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू सर्व्हे क्रमांकावरील अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कार्यवाही करण्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४८ व कलम ४४८ (२) पोट कलम (१) अन्वये सदर अनधिकृत बांधकामांवर निष्कासनाची कार्यवाही करावी अशी मागणी वसई-विरार शहर महानगरपालिकेचे नगरसेवक/गटनेते यांनी दिनांक १३ जुलै, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन पुढे कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) वसई विरार महानगरपालिकेने प्रभाग समिती "क" मधील सर्व्हे क्र. १९०, ५४, १४३, ८१, १८६, १३२, १५२, २११, २१४, १७७, १८८ मध्ये असणाऱ्या अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई केली असल्याचे आयुक्त, वसई विरार महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) होय.

(४) उपरोक्त विषयी कर्तव्यकसूर करणाऱ्या तत्कालीन संबंधित सहाय्यक आयुक्तांवर नियमोचित कारवाई करावी तसेच केलेल्या कारवाईचा अनुपालन अहवाल तात्काळ सादर करावा असे निर्देश आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांना दिले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आयुक्त/उपायुक्त यांच्या मंजूरी शिवाय व्यावसायिक व फेरीवाल्यांना ना हरकत परवाने दिले तसचे नवीन कर आकारणी केल्याबाबत

(७) ३९६६९ (१३-०५-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त-उपायुक्त यांची मंजूरी/स्वाक्षरी न घेता महापालिका क्षेत्रातील व्यावसायिक, फेरीवाल्यांना ना हरकत दाखल्यांचे वाटप तसेच नवीन मालमत्ता कराची आकारणी केल्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषी आढळणाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांने माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास एका सविस्तर निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणकोणत्या व्यक्ती दोषी आढळून आल्या व त्यांच्यावर कोणत्या स्वरुपाची दंडात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय.

वसई-विरार शहर महानगरपालिका स्थापनेपूर्वी नालासोपारा, नवघर-माणिकपूर व वसई या भूतपूर्व नगरपरिषद असताना फेरीवाल्यांना व्यवसाय सुरु करण्याकरिता सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन फी आकारुन ना हरकत दाखला वाटप करण्यात आलेले होते.

तद्नंतर महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर तसेच फेरीवाल्यांचे व्यवसाय व उपजिविकेचे साधन चालू राहावे याकरिता महानगरपालिकेमार्फत फेरीवाल्यांच्या मागणीनुसार ना हरकत दाखल्याचे नुतनीकरण करुन देण्यात आलेले आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना सखोल चौकशी करुन चौकशीमध्ये दोषी आढळलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेने विकास कामे करताना गौण खनिजाच्या रक्कमा बुडवून अटी व शर्तींचा भंग केल्याबाबत

(८) ३९६७३ (१३-०५-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेने आपल्या क्षेत्रात कोट्यवधी रुपयांची विकासकामे करताना गौण खनिजाच्या (स्वामीत्वधन) रकमा बुडवून शासनाच्या महसूल व वन विभागाच्या अटी व शर्तींचा भंग केल्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित दोषी आढळणाऱ्यांवर कार्यवाही करण्याची मागणी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांने दिनांक २२ एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अंती काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणकोणत्या व्यक्ती दोषी आढळून आल्या व त्यांच्यावर कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

वसई-विरार शळर महानगरपालिकेने खालीलप्रमाणे स्वामित्वधनाची रक्कम शासनाकडे भरणा केलेली आहे :-

आर्थिक वर्ष	दिनांक	धनादेश रक्कम	धनादेश संख्या
२०१२-१३	२०.०२.२०१६	२,४६,१५,९७६	८
२०१३-१४			
२०१४-१५	२०.०३.२०१५	१,९८,१५,७०२	९
	३०.०३.२०१५		
एप्रिल, २०१५ ते फेब्रुवारी, २०१६	२२.०३.२०१६	५१,०८०	२
०१.०४.२०१५ ते २८.०३.२०१६	-	३,९४,४४१	२
एप्रिल, २०१५ ते २०.०३.२०१६	२१.०३.२०१६	३,२०,९६१	२
२०१५-१६	२९.०३.२०१६	११,७०,४४३	१

(२) व (३) सदर प्रकरणाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांना चौकशी करुन चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सभागृहाचा बेकायदेशीररित्या वापर करुन कंत्राटदारांनी टेंडर काढल्याबाबत

(९) ३९६७६ (१३-०५-२०१६). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नवघर-माणिकपूर येथील क्षेत्रीय कार्यालयीन इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात दिनांक २० मार्च, २०१५ रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास गुप्त बैठक घेऊन या बैठकीत कंत्राटदार चिठ्ठया काढून टेंडर घेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या सभागृहाचा रात्री बेरात्री बेकायदेशीर वापर करणाऱ्या संबंधितांची चौकशी करुन त्यांच्यावर घुसघोरीचे गुन्हे दाखल करण्याची मागणी एका राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी एका लेखी निवेदनाद्वारे मा.मुख्यमंत्री, तसेच मा.आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांच्याकडे केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीतून पुढे काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने या प्रकरणी कोणकोणत्या व्यक्ती दोषी आढळून आल्या व त्यांच्यावर कोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) होय, असे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या सभागृहाचा बेकायदेशीर वापर होऊ नये याबाबतची दक्षता घेण्याच्या सूचना आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेने दूरसंचार कंपन्यांना रस्त्याखालून केबल टाकण्यासाठी आणि मोकळया जागेवर बेस स्टेशन व कक्ष उभारण्यास परवानगी दिल्याबाबत

(१०) ४०७२३ (१६-०५-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने दूरसंचार कंपन्यांना रस्त्याखालून केबल टाकण्यासाठी आणि मोकळया जागेवर बेस स्टेशन व कक्ष उभारण्यास परवानगी दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिलायन्स जी.ओ इन्फोकॉम कंपनीला ११६० मोकळया जागांवर बेस स्टेशन उभारण्यासाठी पालिकेने परवानगी देताना केबल मायक्रो टनेलिंग पध्दतीने टाकावी अशी महानगरपालिकेने अट घातली असतानाही रिलायन्स जी.ओ. इन्फोकॉम कंपनीने या अटीचे उल्लंघन करून रस्ते, पथपथावर चर खोदून केबल टाकण्याचे काम सुरू केले आहे व हे चर वेळीस भरण्यात येत नसल्यामुळे काही ठिकाणी मोठमोठे खड्डे पडून पादचाऱ्यांना अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे तसेच वाहतूकीलाही अडथळा निर्माण होत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, परळ, शिवडी, बांद्रे, खार, सांताकूझ, अंधेरी, कांदिवली, बोरिवली, मानखुर्द, देवनार आदी विभागामध्ये अशा पध्दतीने हजारो मीटर लांबीचे चर खोदून केबल टाकण्याचे काम सुरू असून रस्त्यांची दुरवस्था झाल्याने हे काम तात्काळ थांबविण्यात यावे व रस्त्यांची दुर्दशा करणाऱ्या रिलायन्स कंपनीवर कठोर कारवाई करण्यात यावी अशा आशयांच्या मागणीचे एक निवेदन मा.मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास विभाग, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका आदीकडे महापालिकेतील विरोधी पक्ष नेते देवेंद्र आंबेरकर यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनानुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

केंद्र शासनाची मार्गदर्शक तत्वे, राज्य शासनाच्या अधिसूचनेतील तरतुदी व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते चर मार्गदर्शक तत्वे २०१५ ला अनुसरून दुरसंचार कंपन्यांना रस्त्याखालून केबल टाकण्याकरिता महानगरपालिकेच्या संबंधित विभाग कार्यालयांमार्फत परवानगी देण्यात येते.

(२) हे खरे नाही.

रिलायन्स जिओ कंपनीला ११६० मोकळ्या जागांपैकी काही ठिकाणी बेस स्टेशन उभारण्यासाठी तसेच मायक्रो / ओपन ट्रेंच या दोन पध्दतीने महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आली आहे.

सदर परवान्याचे उल्लंघन केल्यास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते चर मार्गदर्शक तत्वे - २०१५ ला अनुसरुन कायदेशीर कारवाई करण्यात येते.

(३) व (४) हे खरे नाही.

तथापि, मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉमच्या मायक्रो ट्रेंचच्या पध्दतीबाबत महानगरपिलकेच्या "ए" विभागातून तक्रार प्राप्त झाल्यानंतर आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशानुसार सर्व विभागातील कामे थांबविण्यात आली व महानगरपालिकेच्या सर्व सहाय्यक आयुक्तांना, मे. रिलायन्स यांचेकडून योग्य चर दुरुस्ती करुन घेण्याचे व धोरणाप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिकेचे मुंब्रा, दिवा प्रभाग समितीचे कार्यालय स्थलांतरित करण्यास होत असलेल्या विलंबाबाबत

(११) ४१२३१ (१७-०५-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतीमध्ये सुरु करण्यात आलेले मुंब्रा प्रभाग समितीचे कार्यालय तात्पुरत्या स्वरुपात मुंब्रा येथील अग्निशमन केंद्र व बी.एस.यु.पी. इमारतीमध्ये सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंब्रा, दिवा प्रभाग समितीचे कार्यालय मुंब्रा येथील दोस्ती संकुलामध्ये सुरु करण्यासंदर्भाचे निर्देश मा.मुख्यमंत्र्यांनी माहे जुलै, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान ठाणे महानगरपालिका आयुक्तांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर डंपिंग ग्राउंडचे आरक्षण हटविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ डिसेंबर, २०१५ च्या पत्रान्वये मा.मुख्यमंत्र्यांकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रभाग समिती कार्यालय दोस्ती संकुलामध्ये सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) हे खरे नाही.

(५) मौजे मुंब्रा स.नं. १२०/१/२/अ या जागेवर प्रभाग समिती कार्यलयासाठी जागा उपलब्ध व्हावी याकरिता कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे. उक्त आरक्षण बदलानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

पुणे शहराच्या विकास आराखडयाबाबत

(१२) ४२६२९ (१७-०५-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराचा विकास करण्यासाठी तसचे स्मार्ट सिटीसाठी येथील महानगरपालिकेने साडेतीन हजार कोटी रुपयांचा आराखडा तयार केला असल्याचे दिनांक ३ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त योजनेसाठी निधी उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) स्मार्ट सिटी मार्गदश्रक तत्वानुसार पुणे स्मार्ट सिटीचा रुपये २९३२ कोटी चा विकास आराखडा तयार केला असून सदर आराखडा मान्यतेसाठी केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे.

(२) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (PSSDCL) या विशेष उद्देश वहनासठी स्मार्ट सिटी योजना राबविण्यासाठी सन २०१९ पर्यंत विविध स्त्रोतांद्वारे रुपये १००० कोटी उपलब्ध होणार आहे.

उर्वरित निधी हा केंद्र शासनाच्या अन्य योजनांमधून जमिनीची कमाई (Land Monetization) अतिरिक्त चटई क्षेत्र, पी.पी.बी. कर्ज, कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सबिलीटीद्वारे (Loan CSR) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड (PSSDCL) कंपनी मार्फत उभारण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात महापालिका रुग्णालयासाठी भरीव तदतूद करण्याची मागणी

(१३) ४३४८९ (१७-०५-२०१६). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महापालिका आणि शासकीय दवाखान्याच्या आरोग्य सेवेत वाढ केल्याने सर्वसामान्य जनतेस आरोग्य सेवा परवडत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील महापालिका रुग्णालयांना आरोग्य सेवेसाठी भरीव तरतूद करण्याची मागणी राज्यातील अनेक स्तरातून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महापालिकेच्या रुग्णालयांना भरीव तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) हे अंशत: खरे आहे.
(३) महानगरपालिका या नागरी स्थानिक संस्थांनी त्यांच्या विविध कामाकरीता आवश्यक असलेला निधी उत्पनाचे स्त्रोत निर्माण करुन व वाढवून उभा करणे आवश्यक आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महानगरपालिका येथील घनकचरा प्रकल्पाबाबत

(१४) ४४५१८ (०७-०५-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महानगरपालिका येथील घनकचरा प्रचंड मोठया प्रमाणात निर्माण होत असून सदर कचऱ्याचे शास्त्रीय विल्हेवाट लावण्यासाठी कोणतीही यंत्रणा महापालिकेकडे नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी माहे मार्च, २०१३ मध्ये ठाणे महानगरपालिकेत निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याची प्रक्रिया इन्सीनरेशन पध्दतीने करुन विदयुत शक्ती निर्माण करण्यास अनेक महिन्यापूर्वी मान्यता देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) ठाणे महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे कारवाई केली आहे.
* ठाणे महानगरपालिकेकडे स्वत:च्या मालकीची क्षेपणभुमी नसल्यामुळे दिवा खर्डी येथील मौजे साबे, सर्वे क्र. ३८ मधील खाजगी जागेमध्ये जागा मालकाची आवश्यक ती परवानगी घेऊन सद्य:स्थितीत खर्डी गाव, दिव येथे विल्हेवाट करण्यात येते.
* सदर घनकचऱ्यावर सपाटीकरण करुन त्यावर दुर्गंधी नाशक व जंतुनाशकांची फवारणी करण्यात येते व आवश्यकतेनुसार मातीचा भर देण्याची कार्यवाई केली जाते.
* डायघर येथे वीज-निर्मिती प्रकल्प उभारण्याकरिता मे.क्लीन ठाणे डेव्हलपेंट प्रा.लि. या संस्थेबरोबर दिनांक ०६.०२.२०१६ रोजी करारनामा करण्यात आला आहे.
* डायघर किंवा तळोजा घनकचरा प्रक्रिया प्रकल्पास वन विभागाच्या मान्यतेनंतर या ठिकाणी कचऱ्यावर कंपोस्टीग बायोमिथेन दोन पध्दतीने प्रक्रिया करण्यात येणार आहे.
* शहरातील प्लास्टिकरवर प्रक्रिया करुन इंधन निर्मितीसाठी महासभेच्या मान्यतेनंतर निविदा मागवण्यात आली आहे.

* शहरात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यातून २० टन क्षमतेचा बायोमिथेन गॅस प्रकल्प करण्यात आला आहे. तसेच वुड पेस्ट व गार्डन पेस्ट पासून फ्युएल ब्रिकेट्स बनविण्याचा प्रकल्प कोपरी येथे कार्यान्वीत आहे. तसेच विविध ठिकाणी २-२ टन क्षमतेचे कंपोष्टींग प्रकल्प सुरु केलेले आहेत.
* शहरात निर्माण होणाऱ्या १२५ टन डेब्रीजवर प्रक्रिया करुन पायवाटा बांधण्यासाठी स्वारस्य अभिव्यकती मागवण्यात आली आहे.
* ठाणे महानगरपालिका क्षेत्रात निर्माल्य वेगळे संकलीत करुन त्यापासून २ ठिकाणी बायोगॅस निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद शहरात टॉवर व इमारतींवर मोबाईल टॉवर उभारण्यात आल्याबाबत

(१५) ४८९४४ (१७-०५-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात असलेल्या टॉवर व इमारतींवर अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यात आले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टॉवर उभारण्यास नगररचना विभागाने वा औरंगाबाद महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय,

(३) असल्यास, किती मोबाईल टॉवर उभारण्यास परवानगी देण्यात आली आहे व किती टॉवर विना परवाना उभारण्यात आले आहेत,

(४) असल्यास, अनधिकृत मोबाईल टॉवर उभारण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) मोबाईल टॉवर उभारण्यासंदर्भातील मार्गदर्शक तत्वे नगर विकास विभागाच्या दिनांक ४/३/२०१४ च्या अधिसुचने अन्वये निश्चित करण्यात आली असून, या मार्गदर्शक तत्वांनुसार औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे परवानगी देण्याची कार्यवाही दिनांक १७.३.२०१६ पासून सुरु आहे.

(३) व (४) औरंगाबाद शहरात एकूण ३८८ मोबाईल टॉवर आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार औरंगाबाद महानगरपालिकेने दुरसंचार खात्याच्य धर्तीवर धोरण निश्चित करुन मोबाईल टॉवरला परवानगी देण्यासाठी नियमावली तयार केलेली आहे. त्यानुसार प्राप्त झालेल्या विविध कंपन्यांच्या परवानगीबाबतच्या प्रस्तावांची तपासणी करुन उभारलेल्या मोबाईल टॉवरकरिता दंडाची आकारणी करुन हे नियमित करण्यात येत अहेत, यानुसार आतापर्यंत एकूण ८३ मोबाईल टॉवरला परवानगी देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर स्मार्ट सिटी योजनेसाठी फ्रान्स सरकारकडून किती वित्त सहाय्य उपलब्ध होणार असल्याबाबत

(१६) ४९१५२ (०३-०५-२०१६). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूरच्या स्मार्ट सिटी योजनेला फ्रान्स विविध प्रकारे तांत्रिक तज्ञांचे सहकार्य देणार असून यासाठी फ्रेंच सरकार व राज्य शासनात दिनांक २४ जानेवारी, २०१६ रोजी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सामंजस्य कराराचे स्वरुप काय आहे व नागपूर स्मार्ट सिटी योजनेसाठी फ्रान्स सरकारकडून किती वित्त सहाय्य उपलब्ध होणार आहे,

(३) असल्यास, या योजनेची सद्य:स्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय.

(२) या सामंजस्य कराराप्रमाणे फ्रान्स सरकारचे Agence Francaise Development (AFD) या संस्थेमार्फत तांत्रीक सहकार्य करणे अपेक्षित आहे. या करारामध्ये वित्त पुरवठा करण्याबाबत तरतूद करण्यात आलेली नाही.

(३) फ्रान्स सरकारचे Agence Francaise Development (AFD) ने महानगरपालिकेस स्मार्ट सिटी प्रस्ताव (SCP) तयार करण्याकरीता तांत्रीक सहकार्य पुरविले आहे. नागपूर शहराची स्मार्ट सिटी मध्ये दुसऱ्या फेरीत निवड झालेली आहे. तसेच या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे.

वसई-विरार उपप्रदेशाच्या नियोजनाबाबत

(१७) ४९४०८ (१७-०५-२०१६). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार परिसरातील वाढते औद्यौगिकीकरण व नागरीकरण लक्षात घेता या विभागासाठी सर्व समावेशक असा पायाभूत सुविधांचा बृहत आराखडा (comprehensive infrastructure master plan) तयार करण्यात यावा तसेच सदर विकासाकरिता जपान इंटरनॅशनल एजन्सी (JICA) जपान देशाकडून दिर्घमुदतीचे कर्ज वसई-विरार महानगरपालिकेस उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्र्यांकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या संदर्भातील एक प्रस्ताव स्थायी समिती, वसई-विरार महानगरपालिकेने पारित करून शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वसई-विरारच्या नियोजनाच्या दृष्टीने विकासाचा कोणता कार्यक्रम हाती घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

सदरचा प्रस्ताव स्थायी समितीचा नसून विशेष सर्वसाधारण सभेचा आहे. तसेच सदरचा प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

भंडारा शहरातील पाणी प्रश्नावर झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाचा पाठपुरावा करण्याबाबत

(१८) ५२४६७ (२८-०४-२०१६). श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा (जि.भंडारा) शहरात येणाऱ्या दूषित पाण्याचा निचरा करणे आदी पाणी प्रश्नावर जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात दिनांक २० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास संबंधीत अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत वैनगंगा नदीला दूषित करणाऱ्या नागनदीच्या घाण पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाच्या अंमलबजावणीसाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे आश्वासन जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा प्रशासनाने यासंबंधीत आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) भंडारा शहराच्या समस्यांबाबत सन्माननीय लोकप्रतिनिधी यांच्यासोबत बैठक दि.२५ एप्रिल, २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आयोजित केली होती, हे खरे आहे.
(२) तथापि, सदर बैठक तहकुब करण्यात आल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.
(३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या विहित कार्यपध्दतीनुसार मलनिस्सारण प्रकल्पाचा प्रस्ताव सादर करणेबाबतच्या सूचना भंडारा नगरपरिषदेस देण्यात आल्या आहेत. तथापि, सदर प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहे.

राज्यातील २२७ नगरपालिका व २२ महानगरपालिकेतील प्रस्तावित आरक्षणे तातडीने भूसंपादीत करण्याबाबत

(१९) ५३२८२ (१७-०५-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २२७ नगरपालिका व २२ महानगरपालिकेतील प्रस्तावित आरक्षणे ३० वर्षाहून अधिक काल लोटला तरी आजतागायत भूसंपादीत झाली नसल्याची बाब माहे मार्च, २०१६ पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकेतील सदरहू आरक्षणे तातडीने भूसंपादीत करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे अंशत: खरे आहे.
(२) सदरहू आरक्षणे संपादित करण्याबाबत शासनाने भूसंपदान कायद्यान्वये सुधारणा केली असून, विकास हक्क हस्तांतरणाचे नियमात व समावेशक आरक्षणाचे नियमात आरक्षणांचा विकास सत्वर होण्याच्या दृष्टीने फेरबदल केले आहेत. विकास आराखडा अंमलबजावणी ही निरंतर बाब आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील मनोरंजन मैदान आणि खेळाची मैदाने खाजगी संस्थांना देण्यात आल्याबाबत

(२०) ५३५५५ (०२-०७-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मनोरंजन मैदाने व खेळाची मैदाने खाजगी संस्थांना दत्तक तत्वावर देखभालीसाठी देण्याच्या मुंबई महानगरपालिकेच्या धोरणाला दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील किती, कोणते भूखंड केव्हापासून कोणाच्या ताब्यात आहेत व त्याचे क्षेत्रफळ व त्यासाठी आकारण्यात येणारे भाडे किती आहे,
(३) असल्यास, उपरोक्त मुंबई महानगरपालिकेच्या धोरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१), (२), (३) व (४) मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दत्तक तत्वावर दिलेल्या २१६ भूखंडांपैकी १५८ भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतले असून, उर्वरित ५८ भूखंड परत घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली उद्याने व मनोरंजन मैदाने कोणत्याही संस्थेस देण्यात आलेली नसून, त्यांचे परिरक्षण सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि, उद्याने व मनोरंजन मैदाने यांच्या परिरक्षणासाठीचे तात्पुरते धोरण प्रस्तावित असून, त्यास महानगरपालिकेच्या सुधार समितीने डिसेंबर, २०१६ मध्ये मान्यता दिली आहे. परंतु या तात्पुरत्या धोरणास महानगरपालिकेची अद्यापी मान्यता मिळालेली नाही.

प्रस्तावित तात्पुरते परिरक्षण धोरण :

* सदर कालावधी दत्तक तत्वावर मानण्यात येणार नाही.
* सदर व्यवस्था ११ महिने किंवा दत्तक धोरणाला मान्यता मिळेपर्यंत जे अगोदर असेल तेवढ्या कालावधीसाठी राहील.
* त्याअंतर्गत भूखंड ११ महिन्यांसाठी केवळ परिरक्षणाकरीता संस्थांच्या ताब्यात देण्यात येतील.
* परिरक्षणासाठी देण्यात येणाऱ्या भूभागांवर सर्वसामान्य नागरीकांना प्रवेश व सर्व सोयी सुविधा नि:शुल्क देणे बंधनकारक असेल.

उद्याने व मनोरंजन मैदान दत्तक तत्वावर देण्याचे धोरण महानगरपालिकेमार्फत सर्वंकष विचार करुन पुनर्विलोकित करण्यात येत आहे.

मुंबईतील पी/उत्तर विभागातील नागरीकांना मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

(२१) ५३७२५ (२९-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सन २०११ च्या जनगणनेनुसार सर्वाधिक १० लाख लोकसंख्या असलेल्या महापालिकेच्या पी/उत्तर विभागातील नागरीकांना मुलभूत नागरी सुविधांचा सुरळीत पुरवठा करण्याकरीता पी/उत्तर विभाग कार्यालयाच्या विभाजनास मान्यता दयावी अशी मागणी लोकप्रतिनीधींनी, मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक ०६ जून, २०१६ रोजी दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) पी/उत्तर विभागाच्या विभाजनाच्या कोणताही प्रस्ताव सद्य:स्थितीत महानगरपालिकेच्या विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील १० सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बंद असल्याबाबत

(२२) ५३९८५ (२९-०८-२०१६). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७० सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पापैकी १० प्रकल्प स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या उदासिनतेमुळे बंद आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने नदया, नाले अथवा तलावामध्ये प्रदुषित पाणी मिसळू नये यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारण्याची जबाबदारी शासन आणि स्थानीक स्वराज्य संस्थांना दिली आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बंद पडलेले १० सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प सुरू करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१), (२), (३) व (४) राज्यामध्ये निर्माण झालेले १० सांडपाणी प्रकल्प नागरी स्थानिक संस्थांच्या उदासीनतेमुळे बंद असल्याची बाब अद्याप शासनाच्या निदर्शनास आली नाही. तथापि याबाबत आयुक्त तथा संचालक, नगरपरिष्द संचालनालय यांना सविस्तर अहवाल सादर करणेबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

वसई-विरार, नालासोपारा (जि.ठाणे) या परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याबाबत

(२३) ५५३२९ (२९-०८-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई-विरार, नालासोपारा (जि.ठाणे) या परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाल्याने पाण्यासाठी नागरिकांना भटकंती करावी लागत असून याचा फायदा घेत पिण्याचे पाणी पुरविणाऱ्या खासगी कंपन्या आणि टँकर चालकांनी पाण्याच्या दरात वाढ केली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

वसई विरार शहर महानगरपालिकेने पाणी टंचाई दुर करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे :-

i. टंचाई सदृश्य भागात महानगरपालिकेच्या वार्षिक मंजुर ठेकेदारामार्फत आवयकतेनुसार टँकरने पाणी पुरवठा केलेला आहे.

ii. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रात कायमस्वरुपी पाणी टंचाई दुर करण्याकरीता महाराष्ट्र शासनाच्या नगरोत्थान योजनेअंतर्गत वाढीव १०० द.ल.लि. योजनेचे काम प्रगती पथावर आहे.

iii. शासनाने अमृत योजनेअंतर्गत रुपये १३० कोटी किंमतीची वितरण व्यवस्था मजबूतीकरण प्रकल्प मंजुर केला असून त्याची निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच या प्रमाणे योजनांची कामे पुर्ण झाल्यानंतर महानगरपालिका क्षेत्रातील पाणी पुरवठ्यात सुधारणा होणे अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मालेगाव (जि.वाशिम) शहराला चाका धरणावरुन कायमस्वरुपी पाणी पुरवठा करण्याबाबत

(२४) ५५४०१ (१०-०८-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) शहरामध्ये पाणी टंचाई निर्माण झाली असून सध्या शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या कुरळा धरणातील पाणीसाठा जवळपास महिनाभर पुरेल इतकाच शिल्लक असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे दरवर्षी होणारी तीव्र पाणीटंचाई लक्षात घेता चाका धरणावरुन कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजना करण्याची येथे मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नगर पंचायत मालेगांव यांचे कडून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे करिता निविदा काढण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाने पुण्याच्या स्मार्ट सिटी योजनेसाठी सुमारे १९४ कोटी रुपयांचा निधी शासनाकडे वर्ग केल्याबाबत

(२५) ५५९६५ (२९-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत केंद्र शासनाने पुणे स्मार्ट सिटी योजनेसाठीचा सुमारे १९४ कोटी रुपयांचा निधी शासनाकडे दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास वर्ग केलेला असून सदर निधी वितरीत करताना ७ दिवसांच्या आत तो एसपीव्हीच्या खात्यात जमा करण्याची सूचना केलेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने त्यानुसार सदर निधी वर्ग करण्याकरिता विलंब लावलेला असून त्यामुळे स्मार्ट सिटी योजनेच्या कामात विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय.
(२) व (३) सदर निधी राज्य शासनाच्या हिश्यासह संबंधित महानगरपालिकेस वर्ग करणे आवश्यक असल्याने वित्त विभागाच्या सहमतीने केंद्र हिस्सा रुपये १८६.०० कोटी व राज्य हिससा रुपये ९३.०० कोटी व प्रशासकीय व कार्यालयीन खर्चाकरीता केंद्र हिस्सा रुपये ८.०० कोटी आर्थिक वर्ष सन २०१६-१७ मध्ये पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला वितरीत करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये तज्ञ हायड्रोलिक इंजिनिअरची नियुक्ती करण्याबाबत

(२६) ५६०९४ (२६-८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे महापालिका क्षेत्रामध्ये पाणी वितरणामध्ये गोंधळ निर्माण झालेला असून काही भागात तीव्र पाणीटंचाई जाणवत असल्याने पाणी नियोजन व वितरणात समन्वय साधण्यासाठी तज्ज्ञ हायड्रोलिक इंजिनिअरची नियुक्ती करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक २० एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) होय हे खरे आहे.
(२) ठाणे महानगरपालिकेने याबाबत चौकशी केली नसून महानगरपालिकेने याबाबत खालीलप्रमाणे कळविले आहे.

- मागील वर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने सुमारे २०% ते ४०% इतकी पाणी कपात लागू करण्यात आली होती.
- ठाणे शहरातील उंचावरील व वितरण व्यवस्थेच्या शेवटच्या टोकाकडील भागास पाणी टंचाई जाणवत होती यासाठी पाणी नियोजन व वितरण करुन पाणी पुरवठ्यामध्ये सुसूत्रता आणण्यात आली.
- तथापि पाणी कपातीमुळे काही भागात पाणी टंचाई जाणवत होती.
- सध्या पाणी कपात नसल्यामुळे पाणी पुरवठा सुरळीतपणे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे शहरात सुमारे १ लाख ३६ हजार ७७० बांधकामे बेकायदेशीर असल्याबाबत

(२७) ६२६०८ (२६-०८-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात सन २०११-१२ ते २०१५-१६ पर्यंत सुमारे १ लाख ३६ हजार ७७० बांधकामे अनधिकृत असल्याचे दिनांक १५ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा अनधिकृत बांधकामांमुळे ठाणे शहरातील किती कुटुंबे बाधीत झाली आहेत व महसुल विभागाचे किती रकमेचे नुकसान झाले आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी बेकायदा बांधकामांकडून किती रक्कम दंड म्हणून वसुल करण्यात आली तसेच याबाबत कोण कोणत्या प्राधिकरणाला जबाबदार धरण्यात आले आहे आणि संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०६-२०१७) :(१) हे खरे नाही.

(२) अनधिकृत बांधकाम असलेल्या इमारतींमध्ये राहत असलेल्या कुटुंबाची माहिती ठाणे महापालिकेकडे सद्य:स्थितीतमध्ये उपलब्ध नसल्याचे आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील संबंधित नियोजन प्राधिकरणाची कोणतीही परवानगी न घेता ज्या मिळकतींचे दिनांक ०४.०१.२००८ रोजी व त्यानंतर बांधकाम झाले आहे अशा मिळकतींना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६७ (अ) अन्वये मालमत्ता कराच्या दुप्पट इमती रक्कम शास्ती म्हणून आकारण्यात येते.

सन २०११-१२ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षापर्यंत महानगरपालिका क्षेत्रातील अशा मिळकतीकडून खालीलप्रमाणे वर्ष निहाय शास्ती वसूल करण्यात आलेली आहे. :-

अ.क्र.	आर्थिक वर्ष	शास्तीची वसूल रक्कम रुपये (कोटीमध्ये)
(१)	२०११-१२	३.९१
(२)	२०१२-१३	७.३७
(३)	२०१३-१४	५.१८
(४)	२०१४-१५	६.९९
(५)	२०१५-१६	५.९५
(६)	२०१६-१७	३.७६

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील असंख्य इमारतींमध्ये अग्निसुरक्षा नसल्याबाबत

(२८) ६५४४७ (१६-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशमन दलाने केलेल्या पाहणीत तब्बल ११४ टॉवर व इमारतींनी अग्नी सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इमारतींमध्ये अग्नी सुरक्षा बसविण्याचे आदेश अग्निशमन दलातर्फे दिल्यानंतरही अनेक गृहनिर्माण संस्था त्यास जुमानत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, असंख्य इमारतींमध्ये स्प्रिंकलर्स, फायर पंप, रायझर सिस्टीम, फायर अलार्म व आग लागल्यानंतर तातडीने वर्दी देणारी यंत्रणा आणि ते चालवणारा मुख्य नियंत्रण कक्ष बंद असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, शासनाच्या आदेशाची अमंलबजावणी न करणाऱ्यांवर कारवाई करून सदरच्या इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सदर ११४ इमारतींमधील अग्निशमन यंत्रणेमध्ये त्रुटी आढळल्यामुळे सदर इमारतींना महानगरपालिकेमार्फत नोटीस बजावण्यात आली होती.

सदर ११४ इमारतींनी त्रुटींची पूर्तता करुन अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवली आहे.

(५) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक अधिनियम २००६ मधील कलम ३(३) नुसार इमारतींमधील अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी ही भोगवटादार व इमारतीचे मालक यांची असून, महानगरपालिकेच्या अग्निशमन दलामार्फत इमारतींची यादृच्छित (Randomly) तपासणी करण्यात येते व मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येते.

कुर्ला (मुंबई) येथील लालबहादूर शास्त्री मार्गालगत उद्यानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडाबाबत

(२९) ६५५६३ (१६-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुर्ला (मुंबई) येथील लालबहादूर शास्त्री मार्गालगत उद्यानासाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर मॉल उभारल्याचे व मॉलच्या मागील बाजूची जागा उद्यानासाठी ठेवल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उद्यानाचा विकास करून ते महापालिकेला हस्तांतरण करणे अपेक्षित होते मात्र सदर उद्यान विकास न करताच हस्तांतरित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.

लालबहादूर शास्त्री मार्गालगत कुर्ला येथील नगर भूमापन क्रमांक १२४ ए, १२४ बी, १२४ सी, १२४ डी, १२४ इ व १२४ एफ हा भूखंड सन १९९१ च्या विकास नियोजन मंजूर आराखडानुसार उद्यानासाठी आरक्षित नसून तो औद्योगिक प्रयोजनाकरिता होता.

सदर भूखंड औद्योगिक वापरामधून वाणिज्य वापराकरिता बदल करतांना विकास नियंत्रण नियमावली क्रमांक ५७(४)(सी) नुसार १० टक्के अतिरिक्त मनोरंजन मैदान मोकळे ठेवणे बंधनकारक आहे.

फिनिक्स मॉलच्या मागील बाजूस मनोरंजन मैदानासाठी न.भू.क्र. १२४ सी हा ९९७१.५० क्षेत्रफळाचा भूभाग दिनांक १०.०९.२०१४ रोजी महानगरपालिकेच्या "एल" विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर जागेत जाण्यास वहिवाटीचा रस्ता मोकळा सोडण्यात आला असून, सदर उद्यानाचा विकास विकासकाने करणे विकास परवानगीनुसार अपेक्षित नाही.
(३) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत वाढत्या दैनंदिन दुर्घटनांबाबत

(३०) ६५५८९ (१६-०१-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये गेल्या काही महिन्यात रस्ते अपघात व घरे, इमारती, झाडे पडुन तब्बल ८८२ दुर्घटना झाल्या असून या विविध दुर्घटनांमध्ये नऊ जणांचा मृत्यू झाला असून तीस जण जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दुर्घटनांची संख्या पाहता मुंबईत दररोज विविध प्रकारच्या सरासरी २८ घटना घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाढत्या शहरीकरणांमुळे आपत्कालीन, भौतिक व रस्ते सुरक्षितता तसेच आग प्रतिबंधक उपाययोजना कमी पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईची लोकसंख्या पाहता आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था वाढविण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) मुंबईमध्ये गेल्या एका वर्षात रस्ते अपघात व घरे, इमारती, झाडे पडून तब्बल २५८७ दुर्घटना झाल्या असून, या विविध दुर्घटनांमध्ये ५३ जणांचा मृत्यु झाला असून, १८१ जण जखमी झाले आहेत.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत पुढीलप्रमाणे आगप्रतिबंधक उपाययोजना करण्यात येतात :-

• सध्या अग्निशमन दलाकडे एकूण ५६ फायर इंजिन, ९००० ते १८,००० लिटर क्षमतेचे २८ पाण्याचे टँकर, ३ फोम टेंडर, तसेच टर्न टेबल लॅडर, हायड्रोलिक प्लॅटफॉर्म, रेस्क्यू व्हॅन, श्वसन उपकरण वाहन इ. वाहने असून ती ३४ अग्निशमन केंद्रांवर कार्यरत आहेत.
• पाण्याच्या साठयापासून आगीपर्यंत पाणी नेण्यासाठी अग्निशमन दलाकडे लाईट पोर्टेबल पंप व हायप्रेशर पंप उपलब्ध आहेत.
• गरजेनुसार महानगरपालिकेचे व खाजगी पाण्याचे टँकर्स यांची सुध्दा मदत घेतली जाते.
• नवीन इमारतींना आराखडा मंजूर करतांना इमारतींना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व विकास नियंत्रण नियमावली १९९१ नुसार, पाण्याच्या टाक्या, फायर पंप व रायझर्स इत्यादी इमारतींना बसविणे बंधनकारक आहे.

(४) मुंबईतील आपत्कालीन सुरक्षा व्यवस्था वाढविण्यासाठी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

• मुख्य आपत्कालीन नियंत्रण कक्षामधील संदेशवहन व समन्वय
• शहर आपत्ती व्यवस्थान केंद्र येथील बॅकअप नियंत्रण कक्ष
• २४ ठिकाणी विभागीय नियंत्रण कक्ष कार्यान्वित
• विविध सहकारी यंत्रणांची सुसज्जता
• नौदल
• भारतीय तटरक्षक दल
• राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद पथक
• संकेतस्थळ
• मोबाईल ॲप

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

उल्हासनगर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) बांधकाम परवानग्यांमधील अनियमितता

(३१) ६६५८८ (१६-०१-२०१७). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेतील (जि.ठाणे) नगर रचनाकार श्री.संजीव करपे यांनी माहे जुलै - ऑगस्ट, २०१६ दरम्यानच्या कालावधीमध्ये दिलेल्या सर्व बांधकाम परवानग्यांना दिनांक २७ ऑगस्ट, २०१६ रोजी झालेल्या महासभेत महापौरांनी स्थगिती आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय निदशर्नास आले व तद्नुसार श्री.करपे व इतर संबंधीत अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर प्रकरणी उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

मुंबई महापालिकेतील अग्नीरक्षक पदाच्या भरतीत झालेला गैरव्यवहार

(३२) ६८१९९ (१६-०१-२०१७). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महापालिकेच्या अग्निरक्षक पदाकरिता दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत ओळखीच्या उमेदवाराची निवड होण्यासाठी काही अधिकाऱ्यांनी कागदपत्रात फेरफार करुन गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या फेरफार प्रकरणी एका अधिका-याला निलंबित करण्यात आले असल्याचे दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर भरती प्रक्रियेची चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार सदर प्रकरणी दोषी आढळणा-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) होय, हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलात अग्निशामक पदाकरिता दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी घेण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत ओळखीच्या उमेदवाराची निवड होण्यासाठी श्री.रोशन पंडीत बस्ते, सहाय्यक केंद्र अधिकारी यांनी कागदपत्रात फेरफार केला आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) होय, हे खरे आहे.

सदर फेरफार प्रकरणी श्री.रोशन पंडीत बस्ते यांना दिनांक ०१.०९.२०१६ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) सदर भरती प्रक्रियेची महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

तथापि, सदर प्रकरणी निलंबित अधिकारी श्री.रोशन बस्ते यांची महानगरपालिकेमार्फत खात्यांतर्गत चौकशी करण्यात येत आहे.

मुंबईतील भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनीबाबत

(३३) ६८२६४ (१६-१२-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील भाडेतत्त्वावर दिलेल्या जमिनीची भाडेकराराची मुदत संपल्याने सदर जमिनी बाजार मुल्याप्रमाणे आकारणी करुन ३० वर्षासाठी लिजवर देण्यात येणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतचा शासन निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जमिनी शासनाने ताब्यात घेतल्या आहेत काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१), (२), (३) व (४) महानगरपालिकेने मक्त्याने दिलेल्या ४१७७ मालमत्तांपैकी २५५ मालमत्तांची मुदत संपुष्टात आलेली आहे.

मक्ता संपुष्टात आलेल्या २५५ मालमत्तांपैकी १०३ मालमत्ता अनुसूची 'डब्ल्यु' अंतर्गत राज्य शासनाच्या मालकीच्या आहेत. तसेच, अनुसूची 'व्ही' अंतर्गत १७ मालमत्ता पोलीस विभागास मक्त्याने देण्यात आल्या आहेत व महापालिकेच्या १३५ मालमत्ता आहेत.

• मा.मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार, मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्याबाबत दिनांक १५ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेस निदेश देण्यात आले आहेत.

• मक्ता संपुष्टात आलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत महानगरपालिकेने सन २००१-२००२ मध्ये निश्चित केलेल्या धोरणानुसार मक्ता नुतनीकरणाची कार्यवाही करण्यात येते.

• तथापि, अनधिकृत बांधकामे करण्यात आलेल्या तसेच, मक्ता अटी व शर्तींचा भंग झालेल्या महानगरपालिकेच्या मालमत्तांच्या मक्त्याचे नुतनीकरण करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात येत असून, त्यानुसार मक्ता कालावधी संपुष्टात आलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या १३५ भुभागांचे मक्ता नुतनीकरण करण्यात येणार आहे.

• तसेच, अनुसुची 'व्ही' मधील १७ भुभागांच्या मक्ता नुतनीकरणाबाबत पुढील कार्यवाही सुरु आहे.

विक्रोळी (मुंबई) येथील टागोर नगर भागातील मुस्लीम समाजाच्या कब्रस्थानाबाबत

(३४) ६८८६३ (१६-१२-२०१६). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रोळी (मुंबई) येथील टागोर नगर भागात व आसपासच्या परिसरात मुस्लीम समाजाची ६५ ते ७० हजाराच्यावर लोकसंख्या असून दफनविधीसाठी कब्रस्थान नसल्यामुळे मुस्लीम समाजाची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच परिसरातील जुना सर्व्हे क्र. १६९ नविन सर्व्हे क्र. २७५ न.भू.क. ६५७ पार्ट या भुखंडामधील महापालिकेच्या डी.पी. प्लान रेकॉर्डनुसार सीट क्र. इ-१७ ही जागा मुस्लीम समाजाच्या कब्रस्तानकरीता आरक्षीत असल्याने भुखंड उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी मागील अनेक वर्षापासून करीत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भूखंडाच्या मालकीचा खटला न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे काय, असल्यास, किती वर्षापासून न्यायालयात प्रलंबित आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१), (२), (३), (४) व (५) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या "एस" विभागाच्या सुधारीत विकास मंजूर विकास आराखडयानुसार न.भू.क्र. ६५७ (पै), मौजे कांजूर येथील १७,३९९ चौ.मी. क्षेत्रफळाची जागा स्मशानभूमीकरिता आरक्षित असून सदर जागा सागरी किनारा क्षेत्र-१ ने बाधित आहे.

सदर भूखंडाबाबत मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्रमांक ५७९२/९६ मध्ये स्थगिती आदेश असून, सदर प्रकरण मा. न्यायालयात सुनावणीसाठी प्रलंबित आहे. त्यामुळे सदर भूखंड महानगरपालिकेस हस्तांतरीत करता येणार नसल्याचे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांनी दिनांक ०६.०१.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

माटुंगा येथील न्यू इरा मिलच्या व्यवस्थापनाकडे मालमत्ता कराची थकबाकी असल्याबाबत

(३५) ६९०३५ (१६-०१-२०१७). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माटुंगा (पश्चिम) सेनापती बापट मार्गावरील न्यू इरा मिलच्या जागेवर व्यवस्थापनाकडून गत अनेक वर्षापासून मालमत्ता कराची थकबाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मिलच्या जागेवर एकूण किती शॉपिंग मॉल्स व कार्यालये सुरु आहेत व त्यांची नांवे काय आहेत तसेच सदर दुकाने व शॉपींग मॉल्सला महापालिकेने गुमास्ता परवाने दिले आहेत काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) असल्यास, मालमत्ता कराची थकीत असलेली रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) भांडवली मुल्याधारित करप्रणाली संदर्भातील मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक २५९२/२०१३ मधील आदेशास अनुसरुन पक्षकाराने दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंतचा रु. २.८६ कोटी इतक्या मालमत्ता कराच्या रकमेचा भरणा बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केला आहे.

(२) व (३) सदर मिलच्या जागेवर एकूण ११ आस्थापना असून त्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत :-

- रॉयल कार्बन ब्लॅक प्रा.लि.
- जॉन्सन डाय वर्क प्रा.लि.
- बिग बाझार युनिट ऑफ फ्युचर रिटेल लि.
- होम टाऊन युनिट ऑफ फ्युचर रिटेल लि.
- इ झोन युनिट ऑफ फ्युचर रिटेल लि.
- १२० मिडिया कलेक्टीव्ह प्रा.लि.
- जॅक इन द बॉक्स कम्युनिकेशन प्रा.लि.
- फाऊंटन हेड इंटरटेनमेंट प्रा.लि.
- सुपरफ्लाय मिडिया प्रा.लि.
- न्यु इरा फॅब्रीक्स लि.
- बँक ऑफ बडोदा

उपरोक्त आस्थापनांना महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ कलम ७(१) अन्वये व महानगरपालिकेने वेळोवेळी प्रसारित केलेल्या परिपत्रकांच्या अधीन राहून दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आलेली आहेत.

(४) सदर मिलच्या जागेवरील मालमत्ता कराच्या दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंतच्या रकमेचा भरणा महानगरपालिकेकडे करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिवडी (मुंबई) येथील महानगरपालिकेच्या क्षयरोग रुग्णालयातील रुग्णांची सेवा करणा-या कर्मचा-यांना क्षयरोगाची लागण झाल्याबाबत

(३६) ६९५०३ (१६-०१-२०१७). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शिवडी येथील महानगरपालिकेच्या क्षयरोग रुग्णालयातील रुग्णांची सेवा करणा-या कर्मचा-यांना क्षयरोगाची लागण झाली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णांलयातील तब्बल १७ कामगारांना क्षयरोगाची लागण झाली असून यापैकी ६ जणांना दुस-यांदा सदर आजाराची लागण झाली असून सन २००५ ते २०१६ या कालावधीत ५० हून अधिक कामगारांचा क्षयरोगामुळे मृत्यु झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णांलयातील कामगारांना क्षयरोगाची लागण होण्यापासून बचाव करणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) शिवडी क्षयरोग रुग्णालयात ऑगस्ट, २०१६ वा त्यादरम्यान ९ कर्मचाऱ्यांना क्षयरोगाची लागण झाली असून, त्यापैकी २ कर्मचाऱ्यांना दुसऱ्यांदा क्षयरोगाची बाधा झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

सन २००५ ते २०१६ या कालावधीत ५१ कामगारांचा क्षयरोगामुळे मृत्यु झाला आहे.

(३) सदर रुग्णालयातील कामगारांना क्षयरोगाची लागण होऊ नये यासाठी महानगरपालिकेमार्फत मे, २०११ पासून कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी, तातडीने कल्चर तपासणी, आंतररुग्णांची वर्गवारी, मोफत उपचार, वायुविजन, कर्मचाऱ्यांना आठवडयातून दोन वेळा प्रशिक्षण व समुपदेशन, संरक्षण साधने, कर्मचाऱ्यांसाठी सकस आहार, कर्मचाऱ्यांसाठी विशेष क्षयरोग योजना, क्षयरोग संसर्गनियंत्रयण कमिटी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी बाह्यरुग्ण सेवा व विनामुल्य औषध पुरवठा तसेच अतिनील किरणांची जंतुनाशक प्रकाश उपाययोजना या १२ उपाययोजना अंमलात आणण्यात आल्या आहेत.

तसेच, सदर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना ९५-एन, प्लास्टिक ॲप्रन, हॅण्डग्लोज, मास्क इत्यादी संरक्षक वस्तू आवश्यकतेनुसार पुरविल्या जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

भांडूप (प.) येथील एल.बी.एस.मार्गावर मंगतराम पेट्रोलपंप ते शांग्रीला कंपनी पर्यंतच्या ३०.५० मी. रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम

(३७) ७०८२९ (१६-०१-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांडूप (प.) मुंबई येथील एल.बी.एस.मार्गावर मंगतराम पेट्रोलपंप ते शांग्रीला कंपनी पर्यंतच्या ३०.५० मी. सीमारेषा असलेल्या रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम करण्यासाठी येत असलेले अडथळे दूर करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सर्वेक्षण करुन येणाऱ्या अडथळ्यातील निवासी गाळेधारकांना अनिवासी गाळेधारक व धार्मिक गाळेधारक अशा एकुण ६२६ गाळेधारकांना गाळे निष्कासित करण्याबाबत महानगरपालिका अधिनियम कलम ५६ एसआरटीपी अन्वये नोटीसा बजावून एक वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी सदर रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गावरील एम.आर.व्ही.शिंदे ते भांडूप स्टेशन मार्गाच्या पहिल्या टप्प्यात घेण्यात आलेल्या कामात अडथळे असलेल्या ४४ गाळेधारकांपैकी पूर्णतः बाधित असलेल्या व अशंतः बाधित असलेल्या २२ गाळेधारकांनी महानगरपालिकेस कागदपत्रे सादर करुनही त्यांचे स्थलांतर करण्याचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, लालबहादूर शास्त्री (एल.बी.एस.) मार्गावरील अरुंद रस्त्यामुळे पूर्ण रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम पूर्ण व्हावे यासाठी स्थानिक आमदारांनी मा.मुख्यमंत्री व अतिरिक्त आयुक्त, पूर्व उपनगरे, महानगरपालिका यांना सदर रस्त्यांवर नियमित होणारी वाहतुक कोंडी, वाढत्या लोकसंख्येमुळे पादचारी व प्रवासी नागरीकांना होणारा त्रास व वाढते अपघात टाळावेत यासाठी सन २०१६ मध्ये तक्रार पत्रे देऊनही अद्याप कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्याचे काम केव्हापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) लालबहादुर शास्त्री मार्गाच्या विक्रोळी स्टेशन रोड मुलुंड गोरेगांव पर्यंत रस्ता रुंदीकरणात एकूण ६२६ बांधकामे बाधीत असून, सदर बांधकामधारकांना महानगरपालिकेमार्फत महाराष्ट्र नगररचना अधिनियम ५६ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या होत्या हे खरे आहे.

(२) एल.बी.एस. मार्गाच्या एम.व्ही.आर. शिंदे मार्ग ते भांडुप स्टेशन रोड या टप्प्यात २२ पूर्णत: व २२ अंशत: अशी एकूण ४४ बांधकामे बाधीत आहेत.

सदर बांधकामांची पात्रता निश्चिती प्रगतीपथावर असून, पात्रता निश्चितीनंतर पूर्णत: बाधीत पात्र बांधकामधारकांना स्थलांतरीत करण्यात येणार आहे. तसेच, अंशत: बाधीत पात्र बांधकामधारकांना कुरार पॅटर्ननुसार परवानगी देण्यात येणार आहे.

(३) व (४) लालबहादुर शास्त्री मार्गाच्या आर.आर. पेन्ट जंक्शन तसेच दर्गा रोड जंक्शन या ठिकाणी पूर्णपणे बाधीत असलेल्या १६ पात्र बांधकामधारकांचे पुनर्वसन करुन दोन्ही जंक्शनच्या ठिकाणी रस्ता रुंदीकरण करण्यात आले आहे.

लालबहादुर शास्त्री मार्गाच्या भांडुप व्हिलेज रोड ते भांडुप स्टेशन मार्ग या टप्प्यात एकूण ६६ बाधीत बांधकामधारकांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ सह २९८ अन्वये नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

सदर बाधीत बांधकामधारकांनी महानगरपालिकेकडे कागदपत्रे सादर केली असून, सदर कागदपत्रांची छाननी सुरु असून, पात्रता निश्चितीचे काम महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

मुंबई महापालिकेच्या १२ ऊर्दू शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या संगणक खरेदी करण्याबाबत

(३८) ७१०७५ (१६-०१-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या १२ ऊर्दू उच्च माध्यमिक शाळेतील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या संगणक प्रयोगशाळेसाठी व संगणक खरेदीसाठी शासनाने मंजुर केलेला २७ लाख, १२ हजार रुपयांचा निधी खर्च न झाल्याने परत गेल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण उपसंचालकांनी महापालिकेच्या शिक्षणाधिका-यांना आठ स्मरणपत्रे पाठवूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बाब १ व २ नूसार चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई कली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे आहे.

(३) प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या आदेशानुसार खात्यांतर्गत संक्षिप्त चौकशीची कारवाई करण्यात येऊन दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयाबाबत

(३९) ७२५७१ (१६-०१-२०१७). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या केईएम रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरच्या महिला डॉक्टरांच्या चेंजिंग रुममध्ये एका कर्मचा-याने छुपा मोबाईल कॅमेरा ठेवल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर दोषी कर्मचा-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द भोईवाडा पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.रजि. क्र. २५३/२०१६, कलम ३५४(क) भा.द.वि. अन्वये दिनांक १९.०८.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर कर्मचाऱ्यास प्राथमिक चौकशी व न्यायालयीन चौकशी सापेक्ष अटक झाल्याच्या दिनांक १९.०८.२०१६ पासून निलंबित करण्यात आले आहे.

तसेच, सदर प्रकरणी के.ई.एम. रुग्णालयाच्या सहाय्यक सुरक्षा अधिकाऱ्यांमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

परळ येथील शिरोडकर मंडईच्या पुनर्विकासाबाबत

(४०) ७३८४१ (२१-०४-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळ येथील १०० वर्ष जुन्या महापालिकेच्या शिरोडकर मंडईत १४३ अधिकृत गाळेधारक असून वर्षभरात या मंडईचा पुनर्विकास करण्यात येईल असे सांगून हे पाडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडईच्या पुनर्विकासाबाबत गत २ वर्षात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मंडईतील गाळेधारकांना न्याय मिळवून देण्यासाठी मंडईच्या पुनर्विकासाबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) परळ येथील शिरोडकर मंडईची इमारत संरचना परिक्षणाअंती धोकादायक असल्याने व कोसळण्याची शक्यता असल्याने सदर इमारत सन २०१५ मध्ये पाडण्यात आली.

(२), (३) व (४) सदर मंडईच्या पुनर्विकासासाठीचे आराखडे मंजुरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सदर आराखडे मंजूर झाल्यानंतर सदर मंडईची नवीन इमारत महानगरपालिकेच्या खर्चाने बांधण्यात येणार असून सर्व अनुज्ञापत्रधारकांना महानगरपालिकेमार्फत सदर मंडईमध्ये पुनर्स्थापित करण्यात येणार आहे.

तुमसर (जि.भंडारा) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करून गैरव्यवहार केल्याबाबत

(४१) ७५१०४ (२०-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी पदाचा दुरुपयोग करून नगरपरिषदेच्या अनेक कामात केलेल्या गैरव्यवहाराची चौकशी करून मुख्याधिकारी यांना निलंबित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक ०९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) : (१) होय, हे खरे आहे.

(२) मुख्याधिकारी, तुमसर नगरपरिषद यांनी विविध प्रशासकीय व आर्थिक बाबींमध्ये अनियमितता केली असल्याबाबत त्यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, भंडारा यांनी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांना सादर केला होता.

श्री.चंद्रशेखर गुल्हाणे (वर्ग-२) मधील मुख्याधिकारी असल्याने, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम-१० अन्वये विभागीय चौकशी करण्यासाठी संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांना शासनपत्र दि.७.४.२०१७ अन्वये कळविण्यात आले असून, याबाबत त्यांच्यामार्फत कारवाई सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पवई तलाव प्रदुषित झाला असल्याबाबत

(४२) ७६१४३ (२१-०४-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व उपनगरातील सुमारे १२० जुन्या पवई तलावात आजूबाजूच्या इंडस्ट्रीज, आजूबाजूच्या वसाहतीतून, हिरानंदानी रेनेसन्स आदीचे मलजल (सांडपाणी) मोठया प्रमाणात मागील अनेक वर्षापासून सोडण्यात येत असल्यामुळे सदरहू तलाव दुषित झाला असून पाण्याला दुर्गंधही येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पवई तलावात मागील अनेक वर्षापासून सोडण्यात येणाऱ्या सांडपाण्यामुळे पवई तलाव प्रदुषीत झाल्याची बाब दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीत उपस्थित करण्यात आली असून या तलावात मलजल सोडणाऱ्या हिरानंदानी वसाहत आणि रेनेसन्स या फाइव्ह स्टार हॉटेलवर कारवाई करण्यात यावी तसेच या प्रकरणाची सखोल चौकशी करून येथील प्लॅन कोणी व कसे पास केले याचीही चौकशीची मागणी सदरहू बैठकीत करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू मागणीनुषंगाने पवई तलाव प्रदुषीत करण्यासाठी कारणीभूत असलेल्या सर्व संबंधितांविरोधात चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) पवई तलावात आजुबाजुच्या उदयोग व वसाहतीमधून सांडपाणी तसेच मलजल सोडण्यात येते हे खरे नाही.

तथापि, पवई तलावाच्या आजुबाजूच्या परिसरातील काही वसाहतीतील सांडपाणी अनधिकृतपणे पर्जन्य जलवाहिनीला जोडले असल्याने काही प्रमाणात मलजल पवई तलावात येते ही वस्तुस्थिती आहे.

(२) सांडपाण्यामुळे पवई तलाव प्रदुषित झाल्याची बाब दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीत उपस्थित करण्यात आली होती हे खरे आहे.

(३) व (४) हिरानंदानी वसाहतीतील सांडपाण्याचा निचरा तेथील मलनि:सारण वाहिनीत होतो.

हॉटेल रेनेसन्स येथे सांडपाण्याच्या शुध्दीकरणासाठी सांडपाणी संयंत्र केंद्र उभारण्यात आले आहे.

त्यामुळे हिरानंदानी वसाहत व हॉटेल रेनेसन्स यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही.

सदर परिसरातील सांडपाण्याची व्यवस्था सुधारण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

• पवई मलजल उदंचन केंद्र ते लाल बहादूर शास्त्री मार्गावरील गांधीनगर जंक्शनपर्यंत मलनि:सारण वाहिनी टाकण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

• सदर मलनि:सारण वाहिनी कार्यान्वित झाल्यानंतर पवई येथील सर्व मलप्रवाह लाल बहादूर शास्त्री मार्गावरील १००० मि.मी. व्यासाच्या गुरुत्व मलनि:सारण वाहिनीद्वारे प्रवाहीत होणार आहे.

• तसेच, पवई तलाव परिसरातील इमारतीत सांडपाणी संयंत्र केंद्रे उभारली आहेत किंवा नाहीत, तसेच ती योग्य रीतीने कार्यरत आहेत का हे तपासून योग्य ती कार्यवाही करण्याबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाला दिनांक ०७.०९.२०१६ रोजी कळविण्यात आले आहे.

वांद्रे-खार लिंक रोडवर होणा-या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्याबाबत

(४३) ७६७०२ (२०-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे-खार लिंक रोडवर होणा-या वाहतूक कोंडीवर उपाययोजना करण्यासाठी महापालिकेने आराखडा तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाकरिता किती निधीची तरतूद करण्यात आली वा येत आहे व सदर कामाचा ठेका कोणास देण्यात आला आहे,

(३) तसेच सदर कामाची प्रत्यक्षात केव्हापर्यंत अंमलबजावणी होणार आहे व त्याची सर्वसाधारण रुपरेषा काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) वांद्रे-खार लिंक रोडसाठी महानगरपालिकेमार्फत कोणताही आराखडा तयार करण्यात आलेला नसून, सदर रस्त्यास २७.४५ मी. रुंदीची नियमित रेषा मंजूर करण्यात आलेली आहे.

(२) सदर रस्ता हा पूर्ण रुंदीमध्ये बहुतांश ठिकाणी विकसित झालेला असून, ज्या ठिकाणी रस्ता पूर्ण रुंदीचा नाही त्या ठिकाणी पूर्ण रुंदीचा रस्ता करण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे.

सदर रस्त्याचे रुंदीकरण तसेच रस्त्यालगतच्या पट्टया खराब झाल्यामुळे, वांद्रे टर्नर रोड जंक्शनपासून ओशिवरापर्यंत १४ कि.मी. लांबीच्या दोन्ही बाजूच्या रस्त्यालगतच्या पट्टयांची दुरुस्ती करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आले असून, आतापर्यंत ५०% लांबीच्या रस्त्यालगतच्या पट्टयांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

सदर कामाचा ठेका मे. जे. कुमार-के.आर. (संयुक्त भागीदार) यांना देण्यात आला असून, सदर कामाकरिता रु. १६५.६१ कोटी (कंत्राट मूल्य) इतकी तरतूद करण्यात आली आहे.

(३) सदर कामाचा कालावधी २४ महिने (पावसाळा वगळून) इतका असून, महानगरपालिकेमार्फत सदर कामाचा कार्यादेश दिनांक ०८.०४.२०१५ रोजी देण्यात आला आहे.

सदर काम एप्रिल, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मानखुर्द वाशी येथील जकात नाक्यावरील जकात चोरीबाबत

(४४) ७६७५८ (२०-०४-२०१७). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणुशक्ती विधानसभा मतदार संघातील मानखुर्द वाशी येथील जकात नाक्यावरील जकात चोरीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.नगरविकास राज्यमंत्री यांना निवेदन देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) अणुशक्ती विधानसभा मतदार संघातील मानखुर्द वाशी येथील जकात नाक्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. राज्यमंत्री (नगर विकास) यांना दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी दिलेले निवेदन बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाले आहे.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत तपासणी करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत याबाबत करण्यात आलेल्या उपाययोजना खालीलप्रमाणे आहेत :-

• मुंबई-पनवेल महामार्ग जकात नाक्यावरील जकात चुकवेगिरीला आळा घालण्यासाठी तीनही सत्रातील संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सूचना / आदेश देण्यात आले आहेत.

• जकातपात्र वाहन जकात चुकवून मुंबईच्या दिशेने पळून गेल्यास ताबडतोब जकात नियंत्रण कक्ष, १०० नंबरवर पोलीसांना किंवा पोलीस निरीक्षक, नियंत्रण कक्ष येथे ताबडतोब कळविण्याचे आदेश संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना दिले आहेत.

• तसेच जकात चुकवून पळणाऱ्या वाहनांचा प्रवेशद्वारावरील असलेल्या जीपच्या सहाय्याने पाठलाग करुन पळून जाणारे वाहन परत आणुन ते जकात बुध्दीसंपदा कक्ष वा सत्रप्रमुख यांच्याकडे दंडात्मक वसुलीकरिता ताब्यात देण्याचे आदेश महापालिकेमार्फत देण्यात आले आहेत.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रशासन पातळीवर सुरक्षा रक्षकांची पथके तीनही सत्रात नेमण्यात आलेली आहेत. तसेच दिनांक २८.०८.१५ पासून जकात टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली असून, टास्क फोर्सची निर्मिती झाल्यापासुन दिनांक ३१.०१.२०१६ पर्यंत एकूण २९४४ वाहने जकात वसुलीकरिता अधिक्षेपित करण्यात आली, त्यापैकी मुंबई- पनवेल जकात नाका महामार्गावर एकूण ३३० वाहने जकात वसुलीकरिता अधिक्षेपित करण्यात आली.

• सदर टास्क फोर्सच्या अंमलबजावणीनंतर मुंबई-पनवेल जकात नाक्याच्या जकात संकलनात सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत ६.९६% इतकी वाढ झालेली आहे.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेतील जकात चोरी प्रकरणांना आळा घालण्याकरिता जकात बुध्दीसंपदा कक्षातील फिरते दक्षता पथक रस्त्यावर गस्त घालीत असते.

• बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आली असून, जकात चुकवून मुंबई हद्दीत प्रवेश करणाऱ्या वाहनाचा क्रमांक मुंबईच्या कोणत्याही नागरिकाने नियंत्रण कक्षाच्या २२६२१०५५ या दूरध्वनी क्रमांकावर कळविल्यास, सदर वाहनाचा क्रमांक फिरत्या दक्षता पथकास कळविला जातो व ते वाहन अधिक्षेपित करुन जकातीची अधिकतम दंडासहित वसुली केली जाते.

• प्रवेशद्वाराजवळील कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे जर एखाद्या वाहनाने जकात चुकवून मुंबईत प्रवेश केला आणि ते वाहन पकडले गेले तर अशा कर्मचाऱ्यांवर खात्यामार्फत कायदेशीर कारवाई करण्यात येते.

• तसेच, जकातपात्र वाहने जकात चुकवून पळून जाऊ नयेत व जकातीचे उत्पन्न जास्तीत जास्त वाढावे यासाठी जकात नाक्यांवर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

'ड' वर्गातील महापालिकांना सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानातून सुरु असलेल्या विकासकामांना वेग देण्यासाठी निधी वाढवून देण्याबाबत

(४५) ७६९५६ (२०-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या 'ड' वर्गातील महापालिकांना सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानातून सुरु असलेल्या विकासकामांना वेग देण्यासाठी निधी वाढवून देण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१६ मध्ये घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण डोंबिवली 'क' वर्गात मोडणाऱ्या महापालिकेने 'ड' वर्गातील महापालिकेचे लाभ मिळण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत कोणकोणत्या महापालिकांना निधी मंजूर व किती स्वरुपात करण्यात आला आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :(१) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान राज्यातील "ड" वर्ग महानगरपालिकांमध्ये सन २०१० पासून राबविण्यात येत आहे. तथापि दिनांक २१.०८.२०१४ च्या शासन निर्णयानुसार "ड" वर्ग महानगरपालिकांसाठी असलेले ५०% अनुदान वाढवून ७०% इतके अनुदान उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

(२) कल्याण डोंबिवली महानगरपालिका ही "ड" वर्ग महानगरपालिका असताना सदर शहरासाठी एकूण ३ पायाभूत सुविधांचे प्रकल्प मंजूर केलेले होते. तदनंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिका ही "क" वर्ग महानगरपालिका झाल्यानंतर सुध्दा सदर प्रकल्पांसाठी राज्य शासनाने ७०% च्या प्रमाणात अनुदान उपलब्ध करुन दिलेले आहे.

(३) व (४) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर, भिवंडी, वसई-विरार, उल्हासनगर, अहमदनगर, धुळे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली-मिरज-कुपवाड, नांदेड-वाघाळा, लातूर, अमरावती व मालेगांव या शहरांच्या रु. २६०८ कोटी किंमतीच्या २४ पायाभूत सुविधा प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे.

मुंबईतील बहुसंख्य पालिका शाळांमध्ये इंटरनेट सेवा बंद असल्याबाबत

(४६) ७७२७५ (२१-०४-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बहुसंख्य पालिका शाळांमध्ये एमटीएनएल ब्रॉडबँड कडून घेण्यात आलेल्या प्लॅनच्या किंमतीपेक्षा अधिक बिल आल्याने लेखापाल विभागाने ताशेरे ओढल्याने इंटरनेट सेवा सहा महिन्यांहून अधिक काळापासून बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंटरनेट सेवा बंद असल्याने विद्यार्थ्यांना त्याच्याशी संबंधित आय.सी.टी. सारख्या विषयाचा अभ्यास करणे गैरसोयीचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगर पालिकेतील शिक्षकांनाही शालार्थ व इतर कामांकरिता इंटरनेटची सुविधा गरजेची असल्याने त्यांना सायबर कॅफेमध्ये जावे लागत असून निष्कारण पैसे खर्च करावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मागील सहा महिन्यांपासून बंद पडलेली इंटरनेट सुविधा लवकरात लवकर सुरु करण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ११५२ शाळांपैकी ५१० शाळांमध्ये इंटरनेट सेवा सुरु असून, ६३४ शाळांमध्ये देयकाची रक्कम विहित मर्यादेपक्षा जास्त आल्याने इंटरनेट सेवा बंद आहे.
(२) महापालिकेच्या १४९ माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांना आय.सी.टी. या विषयाचा अभ्यासक्रम शिकविला जातो. या सर्व शाळांमध्ये इंटरनेट सेवा सुरु असल्याने सदर विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागतो हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेतील शिक्षकांना शालार्थ व इतर कामांकरिता जवळच्या विभागीय कार्यालयातील ए.बी.एम. युनिटमध्ये इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(४) बंद पडलेली इंटरनेट सुविधा सुरु करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे:-
• सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना देयकाची थकीत रक्कम भरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
• देयकाच्या दंडाची रक्कम क्षमापित करण्यासंबंधी महानगर टेलिफोन निगम लिमिटेड यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे.
• महानगरपालिकेच्या शाळांमध्ये अमर्यादित इंटरनेट सेवा असून, विहित मर्यादेपेक्षा जास्त कॉल्स केल्याने देयकाची रक्कम मर्यादेपेक्षा जास्त आल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कॉल्सची संख्या विहित मर्यादेत ठेवण्याबाबत सर्व संबंधितांना सक्त सूचना देण्यात आल्या असून, या सूचनांचे उल्लंघन झाल्यास यापुढे संबंधितांकडून जास्त रकमेची वसुली करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबादच्या जलवाहिनीचे काम पूर्ण होण्यापूर्वीच ४० कोटी रुपये खर्च करण्यात आल्याबाबत

(४७) ७८६०५ (२१-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबादच्या पाणी योजनेसाठी ४० कोटी रुपये खर्चाच्या जलवाहिनीचे काम पूर्ण होण्यापूर्वीच संपवल्याचे महापालिकेच्या मुख्य लेखा परीक्षकांनी अहवालात ठपका ठेवल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व सदरहू योजना पूर्ण करून त्याचा नागरिकांना लाभ मिळण्याकरीता काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) हे खरे नसलेबाबत अहवाल आयुक्त, औरंगाबाद महानगरपालिका यांनी सादर केला आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

येवले (जि.नाशिक) शहराला भुयारी गटार योजनेसाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान मधून निधी मिळण्याबाबत

(४८) ७९००१ (२०-०४-२०१७). श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवले (जि.नाशिक) शहराला भुयारी गटार योजनेसाठी सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान मधून निधी मंजुरीसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने दिनांक २६ जून, २०१५ रोजी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला शहरात भुयारी गटार योजना राबविण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०६-२०१७) :(१), (२) व (३) • येवला नगरपरिषदेचा भुयारी गटार प्रकल्प केंद्र शासनाच्या युआयडीएसएसएमटी या योजनेअंतर्गत केंद्रशासनाकडे सादर करण्यात आला होता.

• तथापि सदर प्रकल्पास दिलेली मान्यता केंद्र शासनाने रद्द केल्याने युआयडीएसएसएमटी योजनेतून निधी उपलब्ध झाला नाही.

• केंद्र शासनाकडून निधी मिळण्यापूर्वीच नगरपरिषदेने सदर कामाची निविदा काढून काम सुरु केले.

• सदर प्रकल्प सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानातून मंजुर करण्याचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयाने शासनास सादर केला आहे.

• मात्र हा प्रकल्प नव्याने मंजुर करताना पुन्हा निविदा प्रक्रिया राबवावी लागणार असून अगोदरच सुरु केलेल्या कामासाठी शासनाकडुन निधी अनुज्ञेय राहणार नाही.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत दौंड नगरपरिषदेची २९.४२ कोटी रुपयांची योजना प्रस्तावित करण्यात आली असल्याबाबत

(४९) ७९९१८ (२०-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत दौंड नगरपरिषदेची २९.४२ कोटी रुपयांची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत मा.लोकप्रतीनिधींनी प्रस्ताव सादर करून निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना मंजूर करण्यासाठी शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत दौंड शहर पाणी पुरवठा योजनेची रु.२९.४२ कोटी किंमतीची योजना राज्यस्तरीय नोडल यंत्रणेकडे सादर केलेली आहे, हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

(३) व (४) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या सुधारीत स्थायी आदेशानुसार मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभाग यांच्या पूर्व तांत्रिक मान्यतेने प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे अपेक्षित आहे.

राजीव गांधी जीवनदायी योजना नसलेल्या पालिका रुग्णालयातील गरीब रुग्णांना धर्मादाय संस्थांकडून आणलेल्या निधीतील केवळ १५ ते २० हजार रुपये उपचारासाठी वापरण्याची परवानगी देत असल्याबाबत

(५०) ८२५८६ (२०-०४-२०१७). श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजीव गांधी जीवनदायी योजना नसलेल्या पालिका रुग्णालयातील गरीब रुग्ण महागड्या उपचारासाठी धर्मादाय संस्थांकडून निधी जमवतात व उपचाराचा खर्च कितीही मोठा असला तरी धर्मादाय संस्थांकडून जमा करून आणलेल्या निधीतील केवळ १५ ते २० हजार रुपये उपचारासाठी वापरण्याची परवानगी उपनगरातील काही रुग्णालये देत असल्यामुळे उर्वरित खर्च जमा करून आणलेल्या निधीतून मंजूर करून घेण्यासाठी रुग्णांच्या नातेवाईकांना भाभा रुग्णालयात फे-या माराव्या लागत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकारामुळे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रुग्णांना धर्मादाय संस्थांकडून आलेला पूर्ण निधी वापराबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :(१) व (२) हे खरे नाही.
(३) उपनगरीय रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त २२ अस्थिव्यंग शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत केल्या जातात. यासाठी रुग्णास कोणत्याही धर्मादाय संस्थांकडून निधी उपलब्ध करुन आणण्यास सांगितले जात नाही.

उपनगरीय रुग्णालयांतील गरीब व गरजू रुग्णांना आवश्यक असणारी व वैद्यकीय अधिकाऱ्यांनी लिहून दिलेली औषधे महानगरपालिकेच्या औषध अनुसूचीमधून रुग्णालयांमार्फत पुरविली जातात.

अस्थिव्यंग शल्यक्रियेसाठी रुग्णांसाठी आवश्यक असणारे साहित्य (इम्प्लांटस) महानगरपालिकेच्या अनुसूचीवर उपलब्ध नसल्यामुळे सदर साहित्य रुग्णांना राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या अंतर्गत अनुसूचीतील कंत्राटदारांमार्फत उपलब्ध करुन देण्यात येते. तथापि, त्यासाठी रुग्णांना कोणतेही शुल्क आकारले जात नाही.

तसेच, महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालयांमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना औषधोपचार मोफत दिला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.